# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास

श्री सिध्दिविनायक

(महाराष्ट्र शासन नियंत्रित)

एस्. के. बोले मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०००२८.

दूरध्वनी : ०२२ – ६२४९ ११११ / ११२

ईमेल : admin@siddhivinayak.org | info@siddhivinayak.org

वेबसाईट : www.siddhivinayak.org


द्वितीय मुदतवाढ

महाप्रसाद विभागात भोजनाकरिता दुधापासुन बनविण्यात येणारे पदार्थ पुरवठा करण्याबाबत.

कालावधी

ऑक्टोंबर २०२६ ते सप्टेंबर २०२७

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिरातील महाप्रसाद विभागात भोजनाकरिता दुधापासुन बनविण्यात येणारे पदार्थांचा पुरवठा करण्याकरीता खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून विहित पध्दतीने मोहरबंद दरपत्रके मागविण्यात आले होते. त्यात एकाच दरपत्रकधारकाने सहभाग घेतला असल्याने द्वितीय मुदतवाढ देण्यात येत आहे.

वरील कामाकरीता अटी, शर्तीबाबतची माहिती व दरपत्रके डाऊनलोड करण्यासाठी न्यासाच्या www.siddhivinayak.org या संकेत स्थळावर भेट द्यावी.

| | |
|---|---|
| दरपत्रके प्रसिध्दीचा दिनांक | : शुक्रवार, दि.१८ सप्टेंबर २०२६ |
| दरपत्रके सादर करण्याचा अंतिम दिनांक | : बुधवार,दि.१४ ऑक्टोंबर २०२६,सांय.५ वाजेपर्यंत |
| दरपत्रके उघडण्याचा दिनांक | : शुक्रवार, दि.१६ऑक्टोंबर २०२६, दु. २ वाजता |

अटी व शर्ती :

१) मूळ दरपत्रकात नमूद निर्देशनाप्रमाणे (Specification) दुधापासुन बनविण्यात येणारे पदार्थ खरेदी करण्यासाठी मोहरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहे.

२) आपण देत असलेल्या दुधापासून बनविण्यात येणारे पदार्थांचा दर्जा उत्तम असावा तसेच विक्रीचे स्वतःचे दुकान असावे.

३) दरपत्रकधारकाचे दुकान न्यास कार्यालयापासून २५ किमी अंतरापर्यंत असणे आवश्यक आहे.

४) दुधापासुन बनविण्यात येणारे पदार्थ न्यासाच्या खरेदी विभागात पॅकिंग व फॉरवडींगसह पोच करावयाचा आहे. त्या मालाचा वाहतुक खर्च वेगळा दिला जाणार नाही तसेच मालाच्या पुरवठयाबाबत आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

५) दुधापासुन बनविण्यात येणारे पदार्थांचा पुरवठा करण्यासंदर्भातील कार्यादेश प्राप्त झाल्यापासून पुरवठा करण्याची जबाबदारी आपली राहील. पुरवठा वेळेत न केल्यास किंवा मालाच्या दर्जामध्ये तफावत आढळल्यास किंवा खराब माल पुरवठा केल्यास पुरवठादाराच्या देयकातून २०% रक्कम कपात करण्यात येईल.

६) पुरवठयाचे काम पूर्ण केल्यावर न्यासास बिल सादर करताना बिलामध्ये पॅन कार्ड/जीएसटी क्रमांक व कंपनीच्या बॅंकेचा तपशील नमूद करणे.

७) जीएसटी क्रमांक लागू नसल्यास कंपनीच्या लेटर हेडवर तसे नमूद करून दरपत्रकासोबत सादर करावे.

८) दरपत्रकधारक हा हिंदु असावा.

९) दरपत्रकधारकाने मोहोरबंद दरपत्रकासोबत साक्षांकित करून सादर करावयाची कागदपत्रे :

लिफाफा क्र.१ – अ) कंपनी नोंदणीचा दाखला / ट्रेडिंग लायसन्स

ब) आयकर नोंदणी कार्ड (पॅन कार्ड)

क) ३ वर्षाचा अनुभव दर्शवणारी कागदपत्रे (कार्यादेश/देयके)

लिफाफा क्र.२ – अ) मूल्य दरपत्रक

१०) दरपत्रकधारकाने A ४ साईजच्या एका लिफाफ्यामध्ये तांत्रिक दरपत्रक व दुसऱ्या लिफाफ्यामध्ये मुल्य दरपत्रक अशा दोन वेगवेगळया लिफाफामध्ये भरुन त्यावर संपूर्ण नाव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक त्यावर लिहून, लाखेने सिलबंद करून न्यास कार्यालयात जमा करावे.

११) दरपत्रक भरतांना सर्व प्रकारचे कर वगळून रक्कम भरावी. दरपत्रकामध्ये स्विकृत दर अखेर पर्यंत कायम राहतील. कोणत्याही प्रकारची भाववाढ दिली जाणार नाही.

१२) नियमानुसार आवश्यक तेथे कर रक्कमेची कपात करण्यात येईल. तसेच सर्व प्रकारचे कर अदा करण्याची जबाबदारी दरपत्रकधारकाची राहील.

१३) कागदपत्रे सादर करण्यास असमर्थ ठरलेल्या दरपत्रकधारकाचे दरपत्रक निवड प्रक्रीयेतून बाद करण्यात येईल.

१४) कोणतीही कारणे न देता दरपत्रक स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार न्यासास असेल.

१५) दुधापासुन बनविण्यात येणारे पदार्थाचा पुरवठयासंबधी कोणत्याही प्रकारच्या माहितीची आवश्यकता असल्यास श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी कार्यालयात दूरध्वनी क्र.०२२–६२४९११६० वर संपर्क साधावा.

१६) दुधापासुन बनविण्यात येणारे पदार्थाचा पुरवठा कालावधी समाप्त झाल्यानंतर ही, पुढील मोहरबंद दरपत्रके किंवा ई–निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत चालू मान्य दरानुसार न्यासाच्या खरेदी विभागात दुधापासुन बनविण्यात येणारे पदार्थाचा पुरवठा करणे बंधनकारक राहील.

१७) उपरोक्त अटी व शर्तीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. आपली कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.

द्वितीय मुदत वाढ दि.०८/१०/२०२५.

(रवी चव्हाण)
कार्यकारी अधिकारी